# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
यांचेकार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि.
ठाणेदुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेसनोट क्र-३४६/२०२४** **दिनांक-११/०९/२०२४.**

**"माणिकपुर पोलीस ठाणे मध्ये दाखल गुन्हयातील अपहरीत मुलीचा शोध घेण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा यांना यश"**

माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. २१४/२०२३ भादविसंक ३६३,३७० प्रमाणे मधील अपहरीत मुलगी नामे नित्या जॉन मोंडल वय १७ वर्षे हीस कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचेतरी अमिष दाखवुन फुस लावुन पळवुन नेले म्हणुन दि.०७/०६/२०२३ रोजी २३.११ वा. माणिकपुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. त्यानंतर दि.०५/०४/२०२४ रोजी सदरचा गुन्हा अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक शाखा,नालासोपारा यांचेकडे वर्ग केला आहे.

पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) मि.भा.व.वि. यांचे आदेशान्वये व मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा तपास आम्ही पोनि/सौरभी पवार करीत असताना प्राप्त मोबाईल नंबरचे कॉल डिटेल्सचे तांत्रिक विश्लेषण तसेच इतर साक्षीदार,संशयीताचे आई-वडील,भाऊ यांचेकडे तपासात अधिक चौकशी करताना अपहरीत मुलगी नित्या हिने संशयीत अभय दशरथ चौहान रा.माणिकपुर,मेरी व्हिला शितल बिल्डीग,रुम नं.२०६,दुसरा माळा, ता.वसई याचेशी लग्न करुन गुजरात येथे असल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर संशयीत अभय दशरथ चौहान याचेशी संबंधीत इसमांचे मोबाईल नंबर प्राप्त करुन त्यांना विश्वासात घेऊन अपहरीत मुलगी नित्या जॉन मोंडल हीस आमचे समक्ष हजर होण्यास भाग पाडण्यास अनैतिक मानवी वाहतुक शाखा,नालासोपारा यांना यश आले आहे.

सदरचा गुन्हा हा माणिकपुर पोलीस ठाणे येथे नोंद असल्याने अपहरीत मुलीस पुढील कार्यवाही करीता वरीष्ठारंच्या आदेशान्वये माणिकपुर पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले. सदर गुन्हयाचे अपहरीत मुलगी व इतर साक्षीदार यांचे मोबाईलचे कॉल डिटेल्स व लोकेशनसाठी सफौ/संतोष चव्हाण नेमणुक सायबर विभाग गुन्हे शाखा मि.भा.व.वि.यांचे वेळोवेळी सहकार्य लाभले.

सदरचा तपास हा पोलीस उपआयुक्त श्री अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. बल्लाळ यांचे आदेशानुसार व मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा, नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार व कार्यरत अंमलदार यांना अपहारीत मुलीचा शोध घेऊन तिला तिच्या आई-वडिलांकडे सोपविण्यामध्ये यश प्राप्त झाले आहे.

-----------ooooo----------